श्री. प्रविण जयवंत चौगले,
मु.पो- बिद्री, ता. कागल,
जि. कोल्हापुर. पिन- ४१६२०८
मो.नं- ८८३००९७४२१
दिनांक - / /

प्रति,

-----------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------

**विषय :- महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हासेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मध्ये शहिद जवानाच्या पाल्यास त्याच्या शैक्षणिक अहर्तेनुसार पदोन्नती/ समावून घेणेची तरतुद करणेबाबत...**

संदर्भ (क्र.) १ :- सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद कडील पत्र
जा.क्र.कोजिप/साप्रवि-३/४६३३/६६७/२०२३ दिनांक- ०५/१०/२०२३.

संदर्भ (क्र.) २ :- सामान्य प्रशासन विभाग:शासन निर्णय क्र.अकंपा/१२७/पीसी/१०२८
दिनांक:- २१ सप्टेंबर २०१७, महाराष्ट्र.

संदर्भ (क्र.) ३ :- गृह विभाग:- शासन निर्णय क्र.:-पीडब्ल्युएफ-०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७ मंत्रालय,
दिनांक:- ०६ फेब्रुवारी २००९, महाराष्ट्र शासन.

महोदय,

**उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हासेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ नुसार शहिद सैनिकाच्या पाल्यास त्याच्या शैक्षणिक अहर्तेनुसार पदोन्नती / समावून घेणेची तरतूद नाही असे कळविले आहे.**

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये नुसार सेवाप्रवेश नियमामध्ये **राज्यशासन कर्मचारीच्या अनुकंपा पाल्यास विस्तार अधिकारी, शिक्षण सेवक, ग्रामपंचायत अधिकारी, वरिष्ठ लिपीक, सहाय्यक अभियंता अशा विविध पदावर त्यांच्या शैक्षणीक अहर्तेनुसार पदोन्नती देण्यात येते.**

तसेच संदर्भ क्र.३ अन्वये सेवाप्रवेश नियमामध्ये **नक्षल विरोधी कारवाई/नक्षलवादी हल्यात मृत वा जखमी झालेल्या पोलीस अधिकारी अथवा कर्मचारी व गृहरक्षक दलाच्या कर्मचारी यांच्या कुटंबियापैकी एकास " वर्ग-अ " किंवा "वर्ग-ब " मध्ये अनुज्ञेय उच्चतम वर्गात शासकीय नोकरीत समावुन घेण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.**

**सबब महाराष्ट्र राज्यातील सैनिक आपल्या देशासाठी देहाची आहुती देवुन सर्वोच त्याग करतो. त्यांच्या अभूतपूर्व कर्तव्याची जाणीव व संवेदना आणी सहानुभूती असणे जरुरीचे आहे. त्यानुसार शहिद जवानाच्या पाल्याचा दुजाभाव न करता त्या पाल्याच्या मागणीचा विचार तत्परतेने करण्यात यावे. तरी संदर्भ क्र.२ व संदर्भ क्र.३ च्या अनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हासेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मध्ये शहिद जवानाच्या पाल्यास त्याच्या शैक्षणिक अहर्तेनुसार पदोन्नती / समावून घेणेची तरतुद करणेत यावे अशी नम्र विनंती.**

कळावे,
आपला विश्वासु

( श्री. प्रविण जयवंत चौगले )
मु.पो- बिद्री, ता. कागल

सोबत :-
१) जिल्हा परिषद कोल्हापुर कडील पत्र छायांकित प्रत.
२) सैनिक डिश्चार्ज बुक व ओळखपत्र छायांकित प्रत.
४) RESUME व रिलेशन सर्टिफिकेट छायांकित प्रत.
५) भुमीहीन दाखला छायांकित प्रत.